आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक २७ एप्रिल २०२५

ठळक बातम्या

- दहशतवादाविरोधातल्या लढ्यात देशातली एकी हीच सर्वात मोठी ताकद असल्याचं पंतप्रधानांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन.
- महाराष्ट्रात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांपैकी कुणीही बेपत्ता नसून या सर्व नागरिकांना देशाबाहेर काढायची प्रक्रिया सुरू असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
- देशातील गतिमान आरोग्य सेवेची जागतिक स्तरावर दखल- केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांचे प्रतिपादन; छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कर्करोग रुग्णालयातील ट्रू बीम किरणोपचार प्रणालीचे केले लोकार्पण.
- पूर्व विदर्भातील गडचिरोली चंद्रपूर तसेच अमरावती यवतमाळ येथे आज गारपीटीचा ऑरेंज अलर्ट.

मन की बात

दहशतवादाविरोधातल्या लढ्यात देशातली एकी हीच सर्वात मोठी ताकद असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमातून सांगितलं. हा या कार्यक्रमाचा एकशे एकविसावा भाग होता. सुरुवातीलाच पंतप्रधानांनी पहलगाम इथं पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनं आपलं मन व्यथित झाल्याची भावना व्यक्त केली. या हल्ल्यामुळे देशातला प्रत्येक नागरिक दुःखी असल्याचंही त्यांनी नमूद केलं. काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित होत असताना, शाळा-महाविद्यालयांमध्ये चैतन्य निर्माण होत असताना आणि पर्यटकांची संख्या वाढत असताना दहशतवाद्यांनी काश्मीरला उद्ध्वस्त करण्याच्या हेतूनं हा कट रचल्याचं ते म्हणाले. या आव्हानाचा सामना करण्यासाठी आपले संकल्प अधिक बळकट करावे लागतील आणि एक राष्ट्र म्हणून प्रबळ इच्छाशक्ती दाखवून द्यावी लागेल, असं ते म्हणाले. जगभरातल्या देशांच्या नेत्यांनी या कठीण काळात भारतासोबत असल्याचा संदेश दिल्याचंही त्यांनी नमूद केलं.

*साथियों, भारत के हम लोगों में जो आक्रोश है वो आक्रोश पूरी दुनिया में है। इस आतंकी हमले के बाद लगातार दुनियाभर से संवेदनाएँ आ रही हैं। मुझे भी ग्लोबल लीडर्स ने फ़ोन किए हैं, पत्र लिखें हैं, संदेश भेजे हैं इस जघन्य तरीके से किए गए आतंकी हमले की सबने कठोर निंदा की है। उन्होंने मृतकों के परिवारजनों के प्रति संवेदनाएँ प्रकट की हैं। पूरा विश्व आतंकवाद के खिलाफ़ हमारी लड़ाई में **140** करोड भारतीयों के साथ खड़ा है। मैं पीड़ित परिवारों को फिर भरोसा देता हूँ। उन्हें न्याय मिलेगा, न्याय मिलकर रहेगा। इस हमले के दोषियों और साजिश रचने वालों को कठोरतम जवाब दिया जाएगा।*

ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. के. कस्तुरीरंगन यांचं नुकतंच निधन झाल्याचा उल्लेख करुन पंतप्रधानांनी विज्ञान, शिक्षण आणि भारताच्या अंतराळ क्षेत्रातल्या त्यांच्या कार्याला उजाळा दिला. युवकांची प्रतिभा, शिक्षण आणि अंतराळ विज्ञानाशी संबंधित त्यांच्यासोबत झालेल्या चर्चेचा अनुभव त्यांनी श्रोत्यांसमोर मांडला. त्यांच्यामुळेच इस्रोला नवी ओळख मिळाली तसंच भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला जागतिक मान्यता मिळाल्याचंही त्यांनी सांगितलं. वसुधैव कुटुंबकम् हीच आपली परंपरा आणि संस्कार असल्याचं सांगत पंतप्रधानांनी अलिकडेच म्यानमारमध्ये झालेल्या भीषण भूकंपानंतर भारतानं ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत म्यानमारमध्ये केलेल्या मदत आणि बचाव कार्याची माहिती श्रोत्यांना दिली. या अभियानाअंतर्गत भारताच्या पथकानं तिथं फील्ड हॉस्पिटल उभारलं, अभियंत्यांच्या पथकानं महत्त्वाच्या इमारती आणि पायाभूत सुविधांच्या नुकसानीच्या मूल्यांकनात मदत केली, तर मदत करणाऱ्या पथकानं गरजूंना आवश्यक साहित्य पुरवल्याची माहिती त्यांनी दिली. आपले १४० कोटी नागरिक, त्यांचं सामर्थ्य, त्यांची इच्छाशक्ती हे आपल्या देशाचं सर्वात मोठं बळ आहे असं मोदी म्हणाले. लवकरच येत्या ५ जूनला एक वर्ष पूर्ण होणार असलेल्या, ‘एक पेड मां के नाम’ या वृक्ष लागवड मोहिमेला मिळालेलं यश हे त्याचंच द्योतक असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातल्या नागरिकांनी या अभियानात सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी केलं. पृथ्वीचं आरोग्य सांभाळण्यासाठी, हवामानबदलाच्या आव्हानावर मात करण्यासाठी आणि आपल्या मुलांचं भविष्य सुरक्षित करण्यासाठी वृक्ष लागवड करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्रात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांपैकी कुणीही बेपत्ता नसून या सर्व नागरिकांना देशाबाहेर काढायची प्रक्रिया सुरू असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना दिली.

*आपल्याला गृहमंत्री म्हणून सांगतो आहे, कृपया याच्या उलट-सीध्या बातम्या करू नका. कुणी 107 नागरिक हरवले आहेत एकही नागरिक हरवलेला नाही जेवढे पाकिस्तानी नागरिक आहेत ते सगळे सापडलेले आहेत. सगळे बाहेर चाललेले आहेत, सगळ्याची घालवायची व्यवस्था केलेली आहे. एकही पाकिस्तानी नागरिक याठिकाणी राहणार नाही. माझा अंदाज आहे आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत पूर्ण होईल.*

गृहविभागाच्या आकडेवारीनुसार राज्यातल्या एकंदर ४८ शहरांमध्ये ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक राहतात. या सर्व नागरिकांना आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्यापर्यंत देशातून बाहेर काढलं जाईल, असं फडणवीस यांनी नमूद केलं.

निर्देश माहिती आणि प्रसारण मंत्रालय

देशातल्या सर्व दूरचित्रवाहिन्या, वृत्तसंस्था आणि समाज माध्यम वापरकर्ते यांनी राष्ट्रीय सुरक्षिततेच्या हितासाठी सावधगिरी बाळगण्याचे आणि विद्यमान कायदे आणि नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दिले आहेत. या संदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेत संरक्षणविषयक कारवाईशी संबंधित, कोणत्याही प्रकारचं प्रत्यक्ष दृश्य प्रसारण किंवा स्रोत आधारित माहिती प्रसारित केली जाऊ नये, असं स्पष्टपणे सांगितलं आहे. संवेदनशील माहिती उघड केल्याचा शत्रूला फायदा होऊन आपल्या संरक्षण दलांची कार्यक्षमता आणि सुरक्षितता धोक्यात येऊ शकते. कारगिल युद्ध, मुंबई दहशतवादी हल्ला आणि कंधार अपहरणाच्या घटनांची आठवण यासंदर्भात करून देण्यात आली आहे.

नड्डा

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज सांगितले की, भारत कर्करोगाच्या उपचारात मोठी प्रगती करत असून मोठ्या प्रमाणात उपचार केंद्रे स्थापन करण्यावर आणि लवकर निदानाला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

त्यांनी 'द लॅन्सेट' या मान्यताप्राप्त वैद्यकीय जर्नलच्या एका अहवालाचा संदर्भ देत म्हटले आहे की, सरकारच्या प्रयत्नांमुळे, भारतातील ९० टक्के कर्करोग रुग्ण आता निदान झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत उपचार सुरू करत आहेत, हा जागतिक स्तरावरील विक्रम आहे. छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कर्करोग रुग्णालयातील ट्रू बीम युनिट या कर्करोगावरील अतिविशेष उपचार देणाऱ्या अत्याधुनिक यंत्र प्रणालीचे आणि कर्करोग संस्थेच्या विस्तारित भागाचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच केंद्रीय आरोग्य, मंत्री जे.पी.नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी नड्डा बोलत होते. नवीन ट्रूबीम प्रणाली कर्करोगाच्या रुग्णांवर अधिक अचूक आणि प्रभावी उपचार करण्यास सक्षम ठरणार असून प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंतच्या उपचार खर्चाचा मोफत समावेश केला जात आहे, असेही नड्डा यांनी यावेळी सांगितलं.

*प्रधानमंत्री जन आरोग्य योजना में लगभग 1960 सर्जिकल इनवेशन इंटरवेंशन्स की हमने स्कोप दी है। उस 1960 में 219 पैकेजेस आर ओनली रिलेटेड टु कैंसर यू कॅन अंडरस्टैंड ए पुअर मैन भारत के 60 कारोड लोग 50 कारोड लोग वो जो गरीब है, और 6 कारोड वो माताएं, बहने और बुजुर्ग किसी भी आमदनी के किसी भी आयु के 60-70 साल से ऊपर के लोग जीवन के अंतिम समय तक उनको कैंसर का और उनके लिए 5 लाख रूपये की व्यवस्था जीवन अंत तक करने की व्यवस्था प्रधानमंत्री मोदी जी ने की है, ये भी मैं आपको बताना चाहता हूँ।*

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या समन्वयातून आरोग्य सेवेतील त्रिस्तरीय यंत्रणा पुढील तीन ते चार वर्षात उभी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आरोग्य सेवा **25** सेकंद)*
*आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्या दोघांचे समन्वयात्मक एक चांगली त्रिस्तरीय सिस्टीम ही पुढच्या तीन ते चार वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये आपल्याला उभी करायची आहे की ज्यातन कुठल्याही व्यक्तीला क्वॉलिटी हेल्थ केअर ही सरकारी व्यवस्थेमध्ये त्याच्या घरापासून तीन ते पाच किलोमीटरमध्ये*

*मिळाली पाहिजे अशा प्रकारचा एक ज्याला आपण असं म्हणतो हब अँड स्कोप एक मॉडल हे आता आपण नव्याने तयार करतो आहोत.*

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, राज्यात गेल्या दोन-अडीच वर्षांमध्ये जवळपास दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू केली आहेत. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या जागा वाढल्या आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांसाठी जवळपास पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात आले आहे. ज्यामध्ये जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय हे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रुपांतरित झाले आहेत, अशा जिल्ह्यात स्वतंत्र सामान्य रुग्णालय उभारण्याचा निर्णयही घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

हवामान

हवामान !विदर्भात आज वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागानं वर्तवली आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील काही तासांमध्ये नागपूर, भंडारा, वर्धा जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आज सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला येथे **43** पूर्णांक **9** दशांश अंश सेल्सिअस करण्यात आली असून नागपूरचे कमाल तापमान **42** पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस होते. नागपूरचे हवामान ढगाळ असल्याने तापमानात घट झाली आहे.आज पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर तसेच अमरावती, यवतमाळ येथे गारपीटीचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

आयपीएल

आयपीएल टी-20 क्रिकेटमध्ये, मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरू असलेल्या मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनौ सुपर जायंट्स सामन्यात लखनौ सुपर जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्स संघाने ७ गडी बाद २१५ धावा केल्या असून लखनऊ संघापुढे जिंकण्यासाठी २१६ धावांचे लक्ष ठेवले आहे. लखनऊ सुपर जॉईंटकडून मिचेल मार्श आणि एडेन मेक्रेम सध्या 18 धावा करून धावपट्टीवर खेळत आहेत.

******